जी. क्र. 1771/2017
धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०
फॅक्स २४९७६४२०

03 APR 2017

वाचा : १) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.३४६ दि.१८.१०.२००८
२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.३४७ दि.१८.१२.२००८

**परिपत्रक क्र.** 498 **दिनांक** 03/04/2017

नोंदणीकृत न्यासांच्या अद्ययावत झालेल्या परिशिष्ट-१ (Schedule-1) चे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की त्यामधील नोंदी संबंधित अधिकारी आणि अधिक्षकांकडून अद्यापही साक्षांकित झालेल्या नाहीत.

संदर्भिय परिपत्रक क्र.१ व २ अन्वये परिशिष्ट-१ मध्ये ज्या नोंदी होतील त्या संबंधित अधिकाऱ्यांनी वेळच्या वेळी साक्षंकित होतील याची खबरदारी घ्यावी असे निर्देश देण्यात आले असतानाही परिशिष्ट - १ मधील नोंदी या साक्षांकित झालेल्या दिसून येत नाहीत. सदरची बाब ही गंभीर स्वरुपाची आहे.

तरी याबाबत संबंधित सर्व अधिकाऱ्यांना सुचित करण्यात येते की नोंदणीकृत न्यासांच्या अद्ययावत झालेल्या परिशिष्ट - १ मधील नोंदी ३० मे २०१७ अखेरपर्यंत साक्षांकित करण्यात याव्यात व तसा अहवाल या कार्यालयास त्वरीत पाठवावा. तसे न केल्यास संबंधित अधिकारी / अधिक्षकांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(श.भा.सावळे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :
१. सर्व धर्मादाय सह आयुक्त
२. सर्व धर्मादाय उप आयुक्त
३. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
४. परिपत्रक नस्ती

परिपत्रक क्रमांक ३४६ दिनांक १६/१०/२००८

असे निदर्शनास आले आहे की, परिशिष्ट-१ मध्ये ज्या नोंदी करण्यात येतात त्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून साक्षांकीत होत नाहीत व अशा साक्षांकीत न केलेल्या परिशिष्ट-१ च्या प्रती संबंधीतांना/पक्षकार/हितचिंतकांना देण्यात येतात, जे नियमबाहय आहे.

तरी याबाबत संबंधित सर्व विभागीय अधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की, नोंदणीकृत न्यासांच्या अदययावत झालेल्या परिशिष्ट-१ वरिल नोंदी परिपत्रकाच्या दिनांकानुसार एक महिन्याचे आत साक्षांकीत करण्यात याव्यात व तसा अहवाल या कार्यालयास त्वरित पाठवावा.

त्याचप्रमाणे यापुढे परिशिष्ट-१ मध्ये ज्या नोंदी होतील त्या संबंधित अधिकाऱ्यांनी वेळचेवेळी सांक्षांकीत होतील याची खबरदारी घ्यावी.

तसेच प्रमाणित प्रती पुरवितांना त्या साक्षांकित झाल्यानंतरच देण्यात याव्यात.

या परिपत्रकाची अंमलबजावणी त्वरित करण्यात यावी.

सु धो मोहोड
(सु. धों. मोहोड) १६/१०/०८
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
धर्मादाय सह आयुक्त,
मुंबई/बृहन्मुंबई/पूणे/कोल्हापूर/नाशिक/औरंगाबाद/लातूर/नागपूर/अमरावती

धर्मादाय उप आयुक्त,
मुंबई/बृहन्मुंबई/पूणे/कोल्हापूर/नाशिक/औरंगाबाद/लातूर/नागपूर/अमरावती

सहायक धर्मादाय आयुक्त,
मुंबई/बृहन्मुंबई/पूणे/नाशिक/औरंगाबाद/लातूर/नागपूर/अमरावती/
सोलापूर/सांगली/सातारा/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/रायगड/अहमदनगर/
जळगांव/धुळे/जालना/परभणी/नांदेड/बीड/उस्मानाबाद/भंडारा/यवतमाळ/
चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अकोला/बुलढाणा

मभिसरनोबत/१६१०२००८

क्रमांकः-
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय, ३ रा मज़ला,
८३, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी,
मुंबई ४०० ०१८.

दिनांकः-

याआधी लागू केलेल्या परिपत्रक क्रमांक ३४६ दिनांक १८/१०/२००८ मध्ये काही बदल/दुरुस्त्या करण्यात आल्या असून, सदर परिपत्रकाऐवजी खालील परिपत्रक लागू करण्यात येत आहे.

**परिपत्रक क्रमांक 347 दिनांक 18/12/08**

असे निदर्शनास आले आहे की, परिशिष्ट-१ मध्ये ज्या नोंदी करण्यात येतात त्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून वेळच्यावेळी साक्षांकीत होत नाहीत.

तरी याबाबत संबंधित सर्व विभागीय अधिकाऱ्यांना सुचित करण्यात येते की, नोंदणीकृत न्यासांच्या अदययावत झालेल्या परिशिष्ट-१ वरील नोंदी या परिपत्रकाच्या दिनांकापासून तीन महिन्याचे आत साक्षांकित करण्यात याव्यात व तसा अहवाल या कार्यालयास त्वरीत पाठवावा.

त्याचप्रमाणे यापुढे परिशिष्ट-१ मध्ये ज्या नोंदी होतील त्या संबंधीत अधिकाऱ्यांनी वेळच्या वेळी साक्षांकित होतील याची खबरदारी घ्यावी.

या परिपत्रकाची अंमलबजावणी त्वरीत करण्यात यावी.

9/12/2008

(एम.के.चौरे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
धर्मादाय सह आयुक्त,
मुंबई/बृहन्मुंबई/पुणे/कोल्हापूर/नाशिक/औरंगाबाद/लातूर/नागपूर/अमरावती

धर्मादाय उप आयुक्त,
मुंबई/बृहन्मुंबई/पुणे/कोल्हापूर/नाशिक/औरंगाबाद/लातूर/नागपूर/अमरावती.

सहायक धर्मादाय आयुक्त,
मुंबई/बृहन्मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/लातूर/नागपूर/अमरावती/
सोलापूर/सांगली/सातारा/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/रायगड/अहमदनगर/
जळगांव/धुळे/जालना/परभणी/नांदेड/बीड/उस्मानाबाद/भंडारा/यवतमाळ/
चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अकोला/बुलढाणा